# निवेदन

कोल्हापूर विभागाच्या कृषि सेवक पदाच्या भरती जाहिरात क्रमांक जा.क्र.विकृससं/आस्था/कृसे-भरती/भाग-१/सन २०१८-१९/३५/२०१९ कोल्हापूर दिनांक ०३/०१/२०१९ जाहिरातीनुसार दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी २०१९ रोजी महा ऑनलाईन व्दारे विविध केंद्रावर परिक्षा घेण्यात आली होती. त्या परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी www.krishi.maharashtra.gov.in या वेबसाईट वर दिनांक २३ ऑगस्ट २०१९ रोजी प्रसिध्द करण्यांत आली होती.

या कार्यालयाकडील पत्र क्र. विकृसंस/आस्था/कृसे/भरती-१९/३५४४/कोल्हापूर दिनांक ०९/०९/२०१९ अन्वये सर्वसाधारण अंतरीम गुणवत्ता यादी व निवेदन प्रसिध्द करणेत आले होते. सदर निवेदनामध्ये उपरोक्त यादीमधील उमेदवारांचे काही आक्षेप असल्यास दि.११/९/२०१९ पर्यंत पुराव्याच्या आधारभुत कागदपत्रासह विभागीय कृषि सह संचालक कोल्हापूर, या कार्यालयास प्रत्यक्ष किवा ई-मेल वर अर्ज सादर करण्यास सुचना देण्यात आल्या होत्या त्याअनुषंगाने दिनांक ३०/१०/२०१९ पर्यंत प्रत्यक्ष किंवा ई मेलवर कोणता आक्षेप न आल्याने उपरोक्त दि.९/९/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या सुधारीत अंतरिम गुणवत्ता यादीच्या आधारे अंतिम गुणवत्ता यादी, अंतरीम निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर यादीबाबत उमेदवारांचे काही आक्षेप असल्यास संबंधीत उमेदवारांनी दि.१३/११/२०१९ ते १६/११/२०१९ प्रर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास पुराव्याच्या कागदपत्रासह सादर करण्यात यावेत. विहीत मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

सदर यादी ही अंतरीम असल्याने उपरोक्त नमुद केल्यानुसार उमेदवारांचे काही आक्षेप प्राप्त झाल्यास तसेच समांतर आरक्षणासाठीचे आवश्यक असणारे निकष व सादर केलेल्या अर्जामध्ये मागणी केलेल्या आरक्षणाबाबतच्या सर्व कागदपत्राच्या तपासणीनंतर सदर यादीमध्ये बदल होऊ शकत असल्यामुळे अंतरीम निवड यादी व प्रतिक्षा यादीमध्ये समावेश झालेले उमेदवार हे नियुक्तीसाठी पात्र ठरतीलच असे नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१.अंतरीम निवड यादी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी खालील नमुद केलेल्या दिनांकास मुळ कागदपत्र तपासणीसाठी विभागीय कृषि सह संचालक,कोल्हापूर विभाग कोल्हापूर, भगवा चौक, कसबा बावडा, कोल्हापूर येथे उपस्थित रहावे.

**अंतरीम निवड यादी**

| अ.क्र. | प्रवर्ग | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | खुला | १८/११/२०१९ | सकाळी ११.०० ते ५.०० |
| २. | अ.जा/अ.ज./भ.ज.(क)/इ.मा.व/सा.शै.मा.प्र. | १९/११/२०१९ | सकाळी ११.०० ते ५.०० |

**अंतरीम प्रतिक्षा यादी**

| अ.क्र. | प्रवर्ग | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | खुला | २०/११/२०१९ | सकाळी ११.०० ते ५.०० |
| २. | अ.जा/अ.ज./भ.ज.(क)/इ.मा.व/सा.शै.मा.प्र. | २१/११/२०१९ | सकाळी ११.०० ते ५.०० |

२. अंतरीम निवड यादी व अंतरीम प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी त्यांची खालील प्रमाणे मुळ कागदपत्रे व त्याचे प्रत्येकी दोन छायांकित झेरॉक्स प्रती साक्षांकीत करुन तपासणीसाठी सादर करावेत.

उमेदवारांनी तपासणीसाठी सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी खालील प्रमाणे

१. शासनमान्य संस्था किंवा कृषि विद्यापीठामधील पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणून मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता धारण केल्याचे प्रमाणपत्र (कृषि पदविका /कृषि पदवी )

२. संगणक हाताळणीबाबत D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MSCIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

३. वयोमर्यादा तपासणी करीता शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/एस.एस.सी.चे प्रमाणपत्र (स्कूल लिव्हींग सर्टीफीकेट मूळ प्रत )

४. ज्या प्रवर्गातून अर्ज दाखल केला आहे त्या बाबतचे जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र.

५. शासनमान्य संस्था किंवा कृषि विद्यापीठामधील कृषि पदविका/पदवी किंवा तिच्याशी समतुल्य म्हणून मिळालेली अशी इतर कोणतीही शैक्षणिक अर्हता /उच्च शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास प्रमाणपत्र व गुणपत्रक

६. महाराष्ट्र नागरीसेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना - अ

७. सन २०१८-१९ साठी वैध असलेले उन्नत आणि प्रगत (नॉनक्रिमिलेअर ) गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी तपासणी करुन दिलेले प्रमाणपत्र. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांका पर्यंतचे प्रमाणपत्रच ग्राह्य धरण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

८. माजी सैनिक असल्यास संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण बोर्डाचे प्रमाणपत्र.

९. महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी (Domicile) असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र.

१०.उमेदवार प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त असल्याबाबतचे जिल्हा पुनर्वसन अधिका-यांचे प्रमाणपत्र.

११. उमेदवार खेळाडू असल्यास राज्यस्तर /राष्ट्रीयस्तर / आंतरराष्ट्रीयस्तर मधील प्राविण्य असल्यास कोणते स्थान प्राप्त केले आहे. त्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र.

१२. उमेदवार अंशकालीन कर्मचारी असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचा दाखला.

१३. ऑनलाईन अर्ज दाखल करतेवेळी शुल्क भरणा केल्याचा पुरावा तसेच ऑन लाईन अर्जाची साक्षांकीत प्रत.

१४. दिव्यांग उमेदवार असल्यास दिव्यांगात्वाचे प्रमाण ४० टक्के असणे आवश्यक असून तसे संबधित जिल्हा शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत मंडळाचे संगणकीकृत मूळ प्रमाणपत्र. (SADAREM प्रमाणपत्र )

**१५. अंशकालीन कर्मचारी असल्यास त्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचा दाखला**

**१६. बिगरमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी दावा करणाऱ्या बिगरमागास महिला उमेदवारांना सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले २०१८-२०१९ साठी वैद्य असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र व तहसिलदार तथा उप विभागीय अधिकारी यांना सादर केलेला मूळ प्रस्तावाची छायांकित प्रत, तहसिलदार किंवा उप विभागीय अधिकारी यांचे साक्षांकित करुन सादर करावे.**

१७.अलिकडील काळातील पासपोर्ट /पारपत्र आकाराचा एक फोटो तसेच उमेदवारांचे ओळखपत्र (आधार कार्ड/ पॅनकार्ड/पासपोर्ट/ निवडणूक ओळखपत्र/ वाहनपरवाना इ. पैकी एक )

(दशरथ तांभाळे )
विभागीय कृषि सह संचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर